दैनिक
जनप्रवास बातम्यांचा राजा
● शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६

# पुणे शिक्षक मतदारसंघासाठी टीडीएफकडून कौस्तुभ गावडे यांची उमेदवारी जाहीर

## नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणार निवडणूक



जनप्रवास : कोल्हापूर

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ विधानपरिषद निवडणूक २०२६ येत्या नोव्हेंबर / डिसेंबर महिन्यात होणार आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीने (टीडीएफ) पुण्यामध्ये इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. संघटनेशी असलेली बांधीलकी, शिक्षकांच्या प्रश्नांची जाणीव, मतदार संघात असलेला संपर्क तसेच निवडून येण्याची क्षमता या सर्व गोष्टींचा विचार करून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्यावर विश्वास दाखवून या मतदारसंघासाठी टीडीएफच्या वतीने त्यांची अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. पुणे येथे पत्रकार परिषदेमध्ये प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना टीडीएफचे राज्य अध्यक्ष जी. के. थोरात, राज्याचे कार्यवाह के. एस. ढोमसे, पुणे विभागाचे अध्यक्ष शिवाजी कामथे यांनी केली आहे.

यावेळी पुणे विभाग माध्यमिकचे प्रवक्ते प्रा. शशिकांत शिंदे, पुणे विभागाचे प्रसिद्धीप्रमुख प्रा. संतोष थोरात, राज्य कार्यकारणी सदस्य, निवड समिती सदस्य तसेच टीडीएफचे पदाधिकारी उपस्थित होते. गावडे हे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असून पुणे विभागातील शिक्षकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी नेहमीच आवाज उठवला आहे, तसेच स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मोठे पाठबळ त्यांच्या पाठीशी असल्याने विजयाची खात्री त्यांनी व्यक्त केली आहे. टीडीएफचे माजी आमदार सुरेश पाटील, गजेंद्र ऐनापुरे यानंतर तिसऱ्यांदा टीडीएफच्या वतीने पुणे विभागाचे नेतृत्व करण्याची संधी गावडे यांच्या रुपाने मिळत आहे. यावेळी टीडीएफच्या अधिकृत उमेदवाराच्या पाठीशी पाचही जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी व शिक्षकांनी उभे राहून प्रचंड बहुमताने टीडीएफचा उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करावे, असे आवाहन राज्याचे अध्यक्ष थोरात यांनी केले आहे.

पुण्य नगरी
● शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६




# 'विवेकानंद'च्या एनसीसी छात्रांची किल्ले मुडागड अभ्यास मोहीम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद कॉलेजचा एनसीसी विभाग, सह्याद्री प्रतिष्ठान, कोल्हापूर आणि ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले मुडागड अभ्यास मोहीम आयोजित करण्यात आली. या मोहिमेत विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी विद्यार्थिनींनी सहभाग घेत किल्ल्याचा इतिहास, भौगोलिक रचना आणि परिसरातील जैवविविधतेची माहिती घेतली.

सह्याद्रीच्या पश्चिमेकडील दुर्गम रांगेत घनदाट अरण्यात वसलेल्या मुडागड किल्ल्याची माहिती इतिहास अभ्यासक मानसिंग चव्हाण यांनी दिली. मोहिमेसाठी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, एनसीसी विभागप्रमुख सीटीओ नम्रता नरेवाडीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक **जनप्रवास** बातम्यांचा राजा

● शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६

# युवकांनी क्रीडा क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल करावे

## खासदार धनंजय महाडिक : खेळ हा युवकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपयुक्त

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारत सरकारचा खेलो इंडिया संवाद हा भारताच्या संपूर्ण राष्ट्रीय खेळाचा विकास कार्यक्रम आहे. भारतीय खेळ, संस्कृती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याची सुवर्णसंधी लाभलेली आहे. जो खेळेल त्याचे जीवन फुलाप्रमाणे फुलेल. खेळ हा केवळ पदके जिंकण्यासाठी नसून युवकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपयुक्त आहे. प्रत्येकाने खेळ खेळल्याने आपले जीवन आरोग्यदायी बनते. तंदुरुस्त शरीरासाठी खेलो इंडियात सहभागी होत युवकांनी देशाचे भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहन खासदार धनंजय महाडिक यांनी केले.

खेलो इंडिया संवाद व राष्ट्रीय सेवा योजना उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू वैष्णवी पवार, लॉन टेनिस खेळाडू ऐश्वर्या जाधव यांचा सत्कार केला.



**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना खासदार धनंजय महाडिक. सोबत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कौस्तुभ गावडे, डॉ. मिलिंद हुजरे आदी.**

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने नेहमीच क्रीडा क्षेत्रात नानाविध विक्रम प्रस्थापित केले आहेत. विवेकानंदच्या वीरधवल खाडे, राही सरनोबत, कृष्णराज महाडिक यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक प्राप्त केला आहे. खेलो इंडियाच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या क्रीडा प्रकारात नावलौकिक मिळवण्याची संधी प्राप्त होणार आहे. प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, जुन्या काळी कोल्हापूरच्या खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिकमध्ये कास्यपदक मिळवले. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार याबरोबरच मैदानावर खेळणारा तंदुरुस्त युवा वर्ग हेच आनंदी जीवन आहे. विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात भरपूर यश मिळवून देशाचे नाव उज्ज्वल करावे.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. आभार डॉ. संदीप पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील व समृध्दी चौगुले यांनी केले. यावेळी प्रा. प्रवीण बागडे, डॉ. राजश्री पाटील, प्रा. हेमंत पाटील, प्रा. सुभाष रानमाळे, प्रा. एम. आर. नवले, प्रा. यु. एच. तिजाईकर, डॉ. विकास जाधव, प्रा. एम. पी. गवळी, प्रा. पी. वाय. राठोड, डॉ. ए. जे. पाटील आदी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद | शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६

# युवकांनी क्रीडा क्षेत्रात देशाचे नाव उज्वल करावे

**प्रतिनिधी,कोल्हापूर**

भारत सरकारचा खेलो इंडिया संवाद हा भारताच्या संपूर्ण राष्ट्रीय खेळाचा विकास कार्यक्रम असून भारतीय खेळ, संस्कृती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचव ण्याची सुवर्णसंधी लाभलेली आहे. खेळ हा केवळ पदके जिंकण्यासाठी नसून युवकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपयुक्त आहे. म्हणूनच खेलो इंडिया संवाद हा उपक्रम राष्ट्रीय क्रीडा दिवसाच्या निमित्ताने भारत सरकारने देशभर आयोजित केलेला आहे, असे मत राज्यसभा खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केले.

ते खेलो इंडिया संवाद व राष्ट्रीय सेवा योजना उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.याप्रसंगी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय क्रीडा दिवसाच्या औचित्य् साधून



**कोल्हापूर : राष्ट्रीय क्रीडा दिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना राज्यसभा खासदार धनंजय महाडिक.**

देशातील तरुणांशी ऑनलाईन संवाद साधला त्याचे थेट प्रक्षेपण झाले.

अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष् प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे होते. याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू वैष्णवी पवार व लॉन टेनिस खेळाडू ऐश्वर्या जाधवचा सत्कार करण्यात आला.

स्वागत व प्रास्ताविक विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. यावेळी संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रीय क्रीडा दिवसाच्या औचित्य् साधून देशातील तरुणांशी संवाद साधला. विवेकानंदच्या वीरधवल खाडे, राही सरनोबत, कृष्णराज महाडिक यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक प्राप्त् केला आहे. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, जुन्या काळी खेळाडूला कोणत्याच सुविधा मिळत नसूनही कोल्हापूरच्या खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिक मध्ये कास्यपदक मिळवले.

आभार कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील यांनी मानले. सुत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील व समृध्दी चौगुले यांनी केले.

या कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी, प्रा. एम. पी. गवळी, प्रा. पी. वाय.राठोड, डॉ ए. जे. पाटील, प्रा. पाटील, प्रा सौ. चव्हाण, प्रा. चौगुले, प्रा . खाडे, प्राध्यापक व विद्यार्थी, विद्यार्थिनी, खेळाडू मोठया संख्येने उपस्थित होते.